क्र.२/नसवि/महासभा/ ०६ /२००९-२०१०
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :-०८ जानेवारी २०१०

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महानगरपालिका सभा क्रमांक - ०६ /२००९-२०१०

महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **सोमवार दिनांक १८/०१/२०१० रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय, सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्टातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

परिशिष्ठ

१. मागील म्हणजे सर्वसाधारण सभा दिनांक १९/१२/२००९ च्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवठ्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. तत्कालीन सांगली नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडे वर्ग-३ मधील कायम सेवक यु.बी.कांबळे यांच्या गैरहजेरीच्या कालावधीमध्ये श्री दिलीप भानुदास यादव यांची दि.०२/०९/१९९१ पासून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाने नेमणूक करणेत आली होती. नेमणुकीची मुदत संपणेपूर्वी त्यांनी मा.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर यांचे कोर्टात कंम्प्लेट यु.एल.पी.नं.२३७/१९९१ दावा दाखल केला होता. न्यायालयाच्या अंतरीम आदेशानुसार श्री.यादव हे कामावर हजर आहेत. सदरचा दावा न्यायालयाने काढून टाकल्याने, श्री.यादव यांना कामावरुन कमी करणेत आले होते. त्यावर त्यांनी मा.कामगार न्यायालय, सांगली यांचे कोर्टात कंम्प्लेट यु.एल.पी.नं.७२/१९९६ ने दावा दाखल केला होता. त्यानुसार त्यांना पुन्हा कामावर हजर करुन घेणेत आले. न्यायालयाच्या अंतरीम आदेशावर नगरपरिषदेने रिव्हिजन ॲप्लीकेशन यु.एल.पी.नं.३२०/१९९६ अन्वये दाखल करण्यात आले. सदरचे अपील न्यायालयाने फेटाळले. मे.कामगार न्यायालयातील प्रलंबीत दावा यु.एल.पी.क्र.७२/१९९६ चा निकाल दि.१७/०७/२००४ रोजी होवून, श्री.दिलीप भानुदास यादव यांचे दि.२८/०६/१९९६ पासून सलग सेवा धरुन मागील सर्व फायदे देवून, कामावर हजर करुन घेणेत यावे. याकामी महापालिकेने न्यायालयाच्या निकालावर यु.एल.पी.क्र.०५/२००५ अन्वये रिव्हिजन दाखल केले होते. सदरचे रिव्हिजन फेटाळले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार व महापालिकेचे वकिल श्री.शिंदे याचा अभिप्राय व तडजोडीनुसार श्री.यादव यांना दि.२८/०६/१९९६ पासून कायम स्वरुपाने सेवेत घेणेस तसेच, मागील आर्थिक फायदा न देणेच्या अटीवर मिटर रिडर कम क्लार्क या पदावर कायम करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०४/०८/२००९ चे विषयपत्र.**

२ ...

५. तत्कालीन मिरज नगरपरिषदेमध्ये जुलै १९८९ ते जून १९९० या कालावधीमध्ये फायर फायटर, बागा या विभागाकडे श्री.अनिल पांडूरंग रसाळ हे कामावर होते. सदरची नियुक्ती बेकायदेशीर ठरवून त्यांना कामावरुन कमी करणेत आले होते. या निर्णयाविरुद्ध श्री.रसाळ यांनी मा.कामगार न्यायालय, सांगली येथे दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल होवून, श्री.रसाळ यांची अशंतः मागणी मान्य करुन त्यांना मागील सेवा धरुन सेवेत सामावून घ्यावे असा आदेश दिला होता. सदर आदेशाच्या विरुद्ध मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे अपिल दाखल करणेकामी मुंबई येथील मनपाचे वकील श्री.एन.व्ही.वालावलकर यांचेशी पत्रव्यवहार केला असता, सदर प्रकरणी महासभा ठराव क्र.१३३ दि.१३/०९/२००६ चे निर्णयानुसार श्री.रसाळ यांचेशी तडजोड करुन त्यांना मनपा सेवेत नियुक्ती देवून मागील सेवा निवृत्तवेतनाकरीता गणणेत यावी सदर कालावधीचा कोणताही आर्थिक लाभावर हक्क राहणार नाही या अटीवर श्री.अनिल पांडूरंग रसाळ यांना महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडे मजूर या पदावर दि.०१/०२/२००८ पासून कायम करणेस मान्यता मिळणेकामी **उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०३/११/२००९ चे विषयपत्र.**

६. महापालिकेच्या कुपवाड येथील स.नं.३५५/१ब +२ब, ३५५/१क+२क,३५५/१ड+२ड या जमिनीमधून जाणाऱ्या १००फुट आर.पी.रस्त्याखालील नुकसान भरपाई आदा करणेस महासभा ठराव क्र.१६० दि.१९/१२/२००७ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर ठरावामध्ये ३५५/१ब+२ब ऐवजी ३५५/१ब+२अ अशी दुरुस्ती करणेस मान्यता मिळणेबाबत **उपायुक्त (नगररचना विभाग) दि.१६/०९/२००९ चे विषयपत्र.**

७. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

८. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

महापौर
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

प्र.महापालिका सचिव,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१०

ठराव क्रमांक :- ९५९

विषय क्रमांक :- ०४

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०४/०८/२००९ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

तत्कालीन सांगली नगरपरिषदेच्या पाणी पुरवठा विभागाकडे वर्ग-३ मधील कायम सेवक यु.बी.कांबळे यांच्या गैरहजेरीच्या कालावधीमध्ये श्री दिलीप भानुदास यादव यांची दि.०२/०९/१९९१ पासून निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाने नेमणूक करणेत आली होती. नेमणुकीची मुदत संपणेपूर्वी त्यांनी मा.औद्योगिक न्यायालय, कोल्हापूर यांचे कोर्टात कंम्प्लेट यु.एल.पी.नं.२३७/१९९१ दावा दाखल केला होता. न्यायालयाच्या अंतरीम आदेशानुसार श्री.यादव हे कामावर हजर होते. सदरचा दावा न्यायालयाने काढून टाकल्याने, श्री.यादव यांना कामावरुन कमी करणेत आले होते. त्यावर त्यांनी मा.कामगार न्यायालय, सांगली यांचे कोर्टात कंम्प्लेट यु.एल.पी.नं.७२/१९९६ ने दावा दाखल केला होता. त्यानुसार त्यांना पुन्हा कामावर हजर करुन घेणेत आले. न्यायालयाच्या अंतरीम आदेशावर नगरपरिषदेने रिव्हिजन ॲप्लीकेशन यु.एल.पी.नं.३२०/१९९६ अन्वये दाखल करण्यात आले. सदरचे अपील न्यायालयाने फेटाळले. मे.कामगार न्यायालयातील प्रलंबीत दावा यु.एल.पी.क्र.७२/१९९६ चा निकाल दि.१७/०७/२००४ रोजी होवून, श्री.दिलीप भानुदास यादव यांचे दि.२८/०६/१९९६ पासून सलग सेवा धरुन मागील सर्व फायदे देवून, कामावर हजर करुन घेणेत यावे. याकामी महापालिकेने न्यायालयाच्या निकालावर यु.एल.पी.क्र.०५/२००५ अन्वये रिव्हिजन दाखल केले होते. सदरचे रिव्हिजन फेटाळले आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार व महापालिकेचे वकिल श्री.शिंदे याचा अभिप्राय व तडजोडीनुसार श्री.यादव यांना दि.२८/०६/१९९६ पासून कायम स्वरुपाने सेवेत घेणेस तसेच, मागील आर्थिक फायदा न देणेच्या अटीवर मिटर रिडर कम क्लार्क या पदावर कायम करणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव विषयपत्रिकेवर निर्णयासाठी ठेवला असता, प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. सबब, सदरचा प्रस्ताव ही सभा तुर्त प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक

अनुमोदक

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

महापालिका सचिव,

सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१०

ठराव क्रमांक :- १६०

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (आस्थापना विभाग) यांचे दि.०३/११/२००९ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

तत्कालीन मिरज नगरपरिषदेमध्ये जुलै १९८९ ते जून १९९० या कालावधीमध्ये फायर फायटर, बागा या विभागाकडे श्री.अनिल पांडूरंग रसाळ हे कामावर होते. सदरची नियुक्ती बेकायदेशीर ठरवून त्यांना कामावरुन कमी करणेत आले होते. या निर्णयाविरुद्ध श्री.रसाळ यांनी मा.कामगार न्यायालय, सांगली येथे दावा दाखल केला होता. सदर दाव्याचा निकाल होवून, श्री.रसाळ यांची अशंत: मागणी मान्य करुन त्यांना मागील सेवा धरुन सेवेत सामावून घ्यावे असा आदेश दिला होता. सदर आदेशाच्या विरुद्ध मा.उच्च न्यायालय,मुंबई येथे अपिल दाखल करणेकामी मुंबई येथील मनपाचे वकील श्री.एन.व्ही.वालावलकर यांचेशी पत्रव्यवहार केला असता, सदर प्रकरणी महासभा ठराव क्र.१३३ दि.१३/०९/२००६ चे निर्णयानुसार श्री.रसाळ यांचेशी तडजोड करुन त्यांना मनपा सेवेत नियुक्ती देवून मागील सेवा निवृत्तवेतनाकरीता गणणेत यावी सदर कालावधीचा कोणताही आर्थिक लाभावर हक्क राहणार नाही या अटीवर श्री.अनिल पांडूरंग रसाळ यांना महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडे मजूर या पदावर दि.०१/०२/२००८ पासून कायम करणेस मान्यता मिळणेकामी आलेला प्रस्ताव विषयपत्रिकेवर निर्णयासाठी ठेवला असता, प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. सबब, सदरचा प्रस्ताव ही सभा तुर्त प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजूर

अनुमोदक

महापौर.

Bulgule

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

महासभा क्रमांक :- ०६ दिनांक :- १८/०१/२०१०

ठराव क्रमांक :- १६१

विषय क्रमांक :- ०६

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) दि.१६/०१/२००९ चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

महापालिकेच्या कुपवाड येथील स.नं.३५५/१ब +२ब, ३५५/१क+२क,३५५/१ड+२ड या जमिनीमधून जाणाऱ्या १००फुट आर.पी.रस्त्याखालील नुकसान भरपाई आदा करणेस महासभा ठराव क्र.१६० दि.१९/१२/२००७ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदर ठरावामध्ये ३५५/१ब+२ब ऐवजी ३५५/१ब+२अ अशी दुरुस्ती करणेस मान्यता मिळणेबाबत आलेला प्रस्ताव विषयपत्रिकेवर निर्णयासाठी ठेवला असता, प्रस्तुत विषयी सभागृहामध्ये सविस्तर चर्चा झाली. सबब, सदरचा प्रस्ताव ही सभा तुर्त प्रलंबित ठेवीत आहे.

सूचक

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :-

महापौर.

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.